जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in



६२ ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड, भापकर पेट्रोल पंपा
समोर, सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.
☎ : (०२०) २४२१५५८३
मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१

❖ संस्थापक ❖
स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया

संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया
संपादिका : सौ. सुनंदा एस. चोरडिया

❖ वर्ष ५० वे ❖ अंक १ ला ❖ सप्टेंबर २०१८ ❖ वीर संवत २५४४ ❖ विक्रम संवत २०७४

या अंकात

| | पान नं. |
|---|---|
| ● जैन जागृति सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण | २३ |
| ● क्षमा से विकसित होगी ब्रह्माण्डीय चेतना | २८ |
| ● क्षमा शील बने | २९ |
| ● कव्हर तपशील | ३२ |
| ● आभार गीतिका | ३३ |
| ● ।। जिनेश्वरी ।। अध्याय २९ : सम्यकत्व पराक्रम | ४३ |
| ● बढें आत्म स्वरुप की और | ५७ |
| ● दोषों की शुध्दि : बने लक्ष्य | ६७ |
| ● चातुर्मास में आध्यात्मिक चेतना जगाएँ | ७२ |
| ● प्राणातिपात | ७५ |
| ● समृध्द आणि सुंदर नात्याचे कंगौरे | ७९ |
| ● पर्युषण पर्व - जागृति जैनत्वाची | ८० |
| ● दीपावली पूजन विधी | ९१ |
| ● दीपावली पूजनाचे मुहुर्त | ९७ |
| ● उदायनाचे पर्युषण | ९९ |
| ● चलती रहे जिंदगी....... हमें तुमसे प्यार कितना | १०३ |
| ● हास्य जागृति | ११३ |
| ● कर्मवीर भाऊराव पाटील : एक चरित्र - चिंतन | ११५ |
| ● जीवन की कला | ११९ |
| ● जेलर : पेट्रोल - पाणी | १२३ |
| ● क्षमेचे आराधक श्री कुरगडूक मुनी | १३५ |
| ● हायजिन फर्स्ट | १३७ |
| ● ऐसी हुई जब गुरुकृपा | १३९ |
| ● परिवर्तन | १४३ |
| ● मोबाईल से पहले स्माईल | १४५ |
| ● आरोग्य बाजारात विकत मिळत नाही | १४८ |
| ● संस्कारित बच्चे ही देश का भविष्य हैं | १५१ |
| ● १ ऑगस्ट - कागद दिवस | १५५ |
| ● डॉ. स्वाती पारख - सन्मान | १५७ |
| ● आर. एम. धाडिवाल फाऊंडेशन | १६० |
| ● श्री. सागरमलजी जैन - राष्ट्रपती सन्मान | १६१ |
| ● आचार्य चंदनाजी - पर्युषण पर्व दिल्ली | १६१ |

● क्या धार्मिक आयोजनों मे आडम्बर, प्रदर्शन एवं अपव्यय आवश्यक है १६७
● पार्श्व पद्मावती चॅरिटेबल ट्रस्ट, डोगराळे १६९
● आनंद जन्मोत्सव, चेन्नई १७१
● आचार्य आनंदऋषिजी जन्मोत्सव – चिचोंडी शिराळ १७२
● श्री प्रीतिसुधाजी जन्मदिन, अहमदनगर १७५
● बन्सी–रत्न चॅरिटेबल ट्रस्ट, पुरस्कार १७६
● श्री विजयराजजी रांका, पुणे – संगीतकार १७७
● श्रमणसंघ के रक्षक – श्री रुपमुनिजी रजत १७९
● ईर्ष्या १८१
● वाचकांचे मनोगत १८३
● खुली किताब परीक्षा – जैन रामायण १८४
● पालकत्व एक कौशल्य १८७
● दिव्य संदेश १९१
● भव्य चातुर्मासिक प्रवेश १९२
● धर्म और विज्ञान की जपो माला १९३
● आत्मशुध्दि का प्रेरक पर्व – पर्युषण १९५
● विभाव अवस्था रोग है १९७
● बिना छल कपट संवाद की कला जरुरी १९८
● डायमंड डायरी २००
● उलझन २०१
● आर. के. लुंकड डायलिसिस सेंटर, भोसरी २०३
● मातृ ऋण २०४
● मृत्यु को महोत्सव बनाएँ २०५
● अन्तर्राष्ट्रीय अहिंसा दिवस : २ अक्टूबर २१५
● धर्माच्या कॉलम मध्ये जैन लिहा २१७
● विविध धार्मिक, सामाजिक व राजकिय बातम्या


**जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर** ❖ एका वर्षात तीन मोठ्या अंकासहित

| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० रु. |
|---|---|---|---|---|---|

या अंकाची किंमत ५० रुपये

● www.jainjagruti.in
● www.facebook.com/jainjagrutimagazine

जैन जागृति वर्गणी व जाहिरात – रोख/मनिऑर्डर/ड्राफ्ट/AT PAR चेक/ पुणे चेकने / RTGS / SBI Online / Jain Jagruti Website इत्यादी द्वारा पाठवावी.

**BANK ACCOUNT DETAILS - A/C Name : JAIN JAGRUTI**

**Bank : STATE BANK OF INDIA** **Branch : Market Yard, Pune 37.**

**Current A/c No. : 10521020146** **IFS Code : SBIN0006117**


'जैन जागृति' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक एस. के. चोरडिया यांनी प्रकाश ऑफसेट, शॉप नं. १२–१३, पर्वती टॉवर्स, पुणे – ४११००९ येथे छापून ६२ बी, ऋतुराज सोसायटी, पुणे–सातारा रोड, पुणे – ४११ ०३७ येथे प्रसिध्द केले. संपादक – एस. के. चोरडिया

"Jain Jagruti" monthly magazine is owned, printed & published by S. K. Chordia, Printed at Prakash Offset, Shop No. 12-13, Parvati Towers, Pune 411009. Published at 62-B, Ruturaj Society, Pune - Satara Road, Pune - 411 037. Editor - S. K. Chordia



टिप : या अंकात प्रसिध्द झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. जैन जागृति संबंधित कोणत्याही कायदेशीर कारवाईसाठी पुणे न्यायलय क्षेत्र ग्राह्य धरले जाईल.

**जैन जागृति मासिकात जाहिरात व वर्गणीसाठी संपर्क करा**

फोन (०२०) २४२१५५८३ **मो. संजय:९८२२०८६११७ सुनंदा:९४२३५६२९११, www.jainjagruti.in**

**Email : jainjagruti1969@gmail.com ● Press Email : prakash.offset@rediffmail.com**


## ◆ जैन जागृतिचे प्रतिनिधी ◆

- **भोसरी, चिंचवड, निगडी –** श्री. चांदमलजी लुंकड – फोन : २७११९९४९, मो. ९९२१९१९४०९
- **पुणे शहर ❖ कुर्डुवाडी –** श्री. सुभाष मोहनलाल लुणिया, मो. ८७९३०००००८१
- **गुरूवार पेठ, पुणे –** श्री. जैन पुस्तक भंडार, फोन : २४४७२९५८
- **धनकवडी, पुणे –** श्री. सुरेंद्र हिरालालजी बोरा, मो. ७५८८९४३०१५
- **महावीर प्रतिष्ठान, पुणे –** निलम रमेशचंद्र शहा, मो. ९०९६८००५४७
- **सदाशिव पेठ परिसर, पुणे –** सौ. स्वाती राजेंद्रजी कटारिया, मो. : ९८८१२०४३९०
- **वडगाव शेरी, पुणे –** सौ. भारती सुभाष नहार, मो. : ९८९०२७८३४६
- **वडगाव मावळ, पुणे –** श्री. राजेंद्र बाफना, मो. ९८२२२६२९०१
- **खडकी, पुणे –** श्री. विलास मुथा, मो. ९६२३१४८९८४
- **औंध, पाषाण, हिंजवडी, सांगवी, थेरगाव –** श्री. शिरिषकुमार शांतीलालजी डुंगरवाल, मो. ९०२१३००५५९
- **दापोडी, पुणे –** श्री. प्रवीण झुंबरलालजी चोरडिया, मो. ९९२२७५७७०६
- **नांदेड सिटी, पुणे –** श्री. प्रकाशजी हरकचंदजी बोथरा, मो. ९०११९८३६६६
- **दौंड, श्रीगोंदा –** श्री. रविंद्र चेनसुखलालजी गुगळे – ९८९०७२३४०२
- **अहमदनगर –** श्री. महेश एम. मुनोत– मो. ९४२०६३९२३०
- **जामखेड, आष्टी व कर्जत तालुका –** श्री. प्रफुल शांतीलालजी सोलंकी – मो. ९४०३६८५६७७, ८०८७७०००७०
- **सोनई –** श्री. मदनलालजी सी. भळगट – फोन : ०२४२७–२३१४६१, मो. ९८८१४१४२१७
- **औरंगाबाद –** श्री. सुभाषचंदजी मांडोत–फोन: (०२४०) २३५३४३८ मो.: ९४२२७०५९२१
- **मुंबई** खारघर– श्री. मदनलालजी गांधी–मो. ९८२०५३६७९३
- **नाशिक –** श्री. पुखराजजी बाबुलालजी जैन (कवाड) फोन:०२५३–२३११००८,मो.९४२३९३९९९०
- **नाशिक –** मनोज लखीचंदजी खिंवसरा, रविवार पेठ, नाशिक. मो. ९७६२२२१५०५
- **बीड –** श्री. अतुलकुमार शरदचंद्रजी कोटेचा, मो. ९९६००२४२२४
- **गारगोटी** (जि. कोल्हापूर) श्री. श्रीकांत राजाराम शहा, मो. ९८६०१०७७९२
- **श्रीरामपूर –**श्री. निलेश सुवालालजी हिरण, मो. : ९३२६९७२७४७
- **बारामती–** डॉ. महावीर छगनलालजी संचेती, फोन : ०२११२–२२३८०७ मो.:९३२५००४९५०
- **अमळनेर, जि. जळगाव –** श्री. मयुरकुमार केवलचंदजी जैन, मो. ९४२२६५७१७७
- **जळगाव –** श्री. अनील कुचेरिया, मो. : ९७६३६४५०५५
- **धुळे –** श्री. चेतन सतिष कोटेचा, सुभाषनगर, धुळे, मो. ९४०४१९२४३४, ९४२०६६१४२६
- **शहादा, जि. नंदुरबार –** श्री. मनोजकुमार विरचंदजी बाफना, मो. ९४२१५२९६२६
- **इचलकरंजी, जि. कोल्हापूर –** श्री. पोपटलालजी बिसनदासजी गुगळे, मो. ९८२२६५०९९८
- **मिरज, जि. सांगली –** श्री. राजेंद्र वसंतलाल शहा, मो. ९४२११०५७४८
- **कोल्हापूर –** सौ. लता कांतीलालजी ओसवाल, मो. ९४२३२८६०१४ फोन.०२३१–२६९५४३३
- **सातारा व सातारा जिल्हा –** श्री. जयकुमार कांतीलाल शहा, वाठार, मो. – ७५८८५६१३२०, ९८५०१८२६४४

# जैन जागृति 'सुवर्ण महोत्सवी - Golden Jubilee' वर्षात पदार्पण...



**जैन जागृतिचे संस्थापक**
**स्व. श्री. कांतिलालजी फुलचंदजी चोरडिया**



**संजय चोरडिया**

**संपादक**



**सौ. सुनंदा चोरडिया**

सप्टेंबर२०१८ - पर्युषण अंका बरोबर गेली ४९ वर्षे ध्येयनिष्ठ, व्यासंगी आणि विवेकी पत्रकारितेची कास धरुन समाजोन्नतीचा वसा घेतलेले ''जैन जागृति'' ५० व्या वर्षात पदार्पण करीत आहे.

वीतराग प्रभू व गुरु भगवंताचे आशिर्वाद, वर्गणीदार, जाहिरातदार, लेखक, पत्रप्रचारक, प्रिटींग प्रेस, बायंडर, पोस्ट ऑफीस आणि हितचिंतक यांच्या सहयोगाने व सहकार्या मुळेच जैन जागृतिने ४९ वर्षे आपली यशस्वी वाटचाल पूर्ण केली आहे.

पुणे शहरातून गेली ४९ वर्ष दरमहा नियमितपणे प्रकाशित होणारे 'जैन जागृति' मासिकाची सुरुवात १५ ऑगस्ट १९६९ रोजी श्री. कांतीलालजी चोरडिया यांनी केली. त्या काळी मासिके व वर्तमान पत्रामधून जैन समाजाची फार थोडी माहिती प्रसिद्ध होत होती व त्यातही जैन धर्माबद्दल, समाजाबद्दल चूकीची माहिती येत असे. सर्वांना जैन धर्माची खरी ओळख व्हावी, जैन इतिहास, जैन कथा साहित्य, दीपावली जैन विधी, जैन तीर्थक्षेत्र इ. माहिती सर्वांना व्हावी या उद्देशाने प्राध्यापकाची नोकरी सोडून त्यांनी 'जैन जागृति' मासिक सुरु केले.

मासिक व्यवस्थित चालण्यासाठी अथक परिश्रम घेतले. स्वत: महाराष्ट्रातील अगदी लहानात लहान गावात जावून ग्राहक बनवले. मासिकात उत्कृष्ट साहित्य प्रकाशित व्हावे यासाठी स्वत: गाढा अभ्यास करुन अनेक लेख लिहिले. त्यांच्या पुरुषार्थाने 'जैन जागृति' मासिक नावारुपाला आले, लोकप्रिय झाले. व अल्पकाळात 'जैन जागृति' जैन समाजात सर्वांत जास्त खपाचे मासिक बनले. त्यांच्या या कार्यात पत्नी चंचलबाई यांची मोलाची साथ मिळाली.

श्री. कांतीलालजी यांच्या निधनानंतर गेल्या १९ वर्षापासून 'जैन जागृति' मासिकाची धुरा संजय चोरडिया

व सौ. सुनंदा चोरडिया सांभाळत आहे. 'जैन जागृति'चा मुळ गाभा तसाच ठेवून, त्यात नवीन विचाराची, आधुनिकतेची भर घालून मासिक प्रकाशनात उच्च शिखर गाठले आहे.

नावाला साजेसे धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, कौटुंबिक सर्वस्पर्शी लेख या अंकात प्रसिध्द होतात. समाजावर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात लेखणीद्वारे खरी बाजू मांडली जाते. याच बरोबर समाजातील ताज्या घडामोडीच्या बातम्या यांना योग्य स्थान दिले जाते. एक संप्रदाय किंवा एक संस्था पुरते जैन जागृति मर्यादित नाही. समाजातील सर्व संप्रदाय, उपसंप्रदाय यांना उदार दृष्टीकोणातून समान व्यासपीठ दिले जाते. जैन समाजातील महत्त्वाच्या सर्व घडामोडी 'जैन जागृति' मासिकामुळे महाराष्ट्रातील जैन समाजाला समजतात.

जीवनात सुख, शांती आणि समाधान देणारे वाङ्मय प्रत्येक अंकात असते. या सर्व कारणांनी हे मासिक सर्व समाजाला आपलेसे वाटते. जैन इतिहास, जैनांची थोर परंपरा, कथा साहित्य, धार्मिक व सामाजिक कार्याची माहिती समाज बांधवां पर्यंत पोहोचवणे व जैन बांधवात धर्म जागृति, जैनत्वाचा अभिमान निर्माण करणे हे कार्य जैन जागृति मासिक यशस्वीपणे करत आहे.

### जैन धर्माला अल्पसंख्याक दर्जा ....

जैन धर्म हा स्वतंत्र व प्राचीन धर्म असून तो कोणत्याही धर्माची शाखा उपशाखा नाही. जैन धर्माला केंद्रात व राज्यात धार्मिक अल्पसंख्याक दर्जा मिळावा यासाठी जैन जागृति मासिकात या संदर्भात सन १९९५ पासून या विषयावर अनेक लेख, मुलाखती, बातम्या दिल्या. महाराष्ट्रात या संदर्भात पहिला लेख जैन जागृति मासिकात आला. हा विषय जास्तीत जास्त जैन बांधवा पर्यंत पोहोचवला. समाजात या संदर्भात जागृति निर्माण केली.

### धर्माच्या कॉलममध्ये जैन लिहा

भारत सरकार दर दहा वर्षाची जनगणना करते. यात जैनांची लोकसंख्या फार कमी येते. जैन बांधवांना या दृष्टीने जागृत करण्यासाठी अनेक लेख प्रसिध्द केले. दर अंकात या सदंर्भात निवेदन प्रसिध्द केले जाते.

### जैन विधीचा प्रचार

जैन बांधवानी दीपावली पूजा, लग्न कार्य इ. विधी जैन धर्मा प्रमाणे कराव्या या संदर्भात लेख, बातम्या दिल्या. जैन जागृति मध्ये दीपावली पूजनाची विधी दरवर्षी दिली जाते. आज सर्वात जास्त जैन समाज जैन जागृति मासिक समोर ठेवून दीपावली पूजा करतात.

### जैन जागृति मासिकास पुरस्कार

गत ४९ वर्षात जैन जागृति मासिक समाजासाठी करत असलेल्या समाज सेवेच्या कार्यामुळे अनेक गुरु भगवंत, जैन संस्था व अनेक संघानी भगवान महावीर जयंती, पर्युषण पर्व, स्थानक उद्‌घाटन, दीक्षा महोत्सव, प्रतिष्ठा महोत्सव इ. प्रसंगी संपादकाचा सत्कार केला आहे.

आगमोध्दारक पारितोषिक, गुरु आनंद कार्यक्षम पत्रकार पुरस्कार, पुणे मनपा गौरव पदक, जैन एकता साहित्य पुरस्कार - मुंबई, यशस्वी पत्रकार पुरस्कार - दिल्ली, जैन सामुहिक उत्सव समिती पुणे पुरस्कार, भारतीय जैन संघटना पुरस्कार इ. अनेक पुरस्कार, सन्मान जैन जागृति मासिकाला मिळाले आहे.

### बेस्ट जैन मासिक पुरस्कार



श्री सुर्यदत्ता एज्युकेशन फाऊंडेशन, बन्सी-रत्न

चेरिटेबल ट्रस्ट व वर्धमान प्रतिष्ठान शिवाजीनगर पुणे यांच्या तर्फे आदर्श माता-पिता पुरस्कार, समाजभूषण पुरस्कार व १० वी आणि १२ वी तील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार १२ ऑगस्ट २०१८ रोजी करण्यात आला. या प्रसंगी सामाजिक कार्यात मोलाचे योगदान देणाऱ्या जैन बांधवांचा देखील सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी जैन जागृति मासिकाला ''बेस्ट जैन मासिक पुरस्कार'' देवून सन्मानित करण्यात आले. जैन जागृतिचे संपादक श्री. संजय कांतीलालजी चोरडिया यांना अभिनेते रझा मुराद, योगाचार्य संप्रसाद यांच्या हस्ते मोमेन्टो व सन्मान पत्र देण्यात आले. यावेळी श्री सुर्यदत्ता एज्युकेशन फाऊंडेशनचे संजय चोरडिया, सुषमा चोरडिया, प्रज्ञाज्योती श्री सुधाकंवरजी म.सा., प्रखर वक्ता श्री विजयाप्रभाजी म.सा. आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ४९ व्या वर्षात १७१६ पाने प्रकाशित

जैन जागृति मासिकाने ४९ व्या वर्षाच्या (सप्टेंबर २०१७ ते ऑगस्ट २०१८) काळात १७१६ पानांचा मजकूर प्रकाशित केला आहे.

## www.jainjagruti.in

जैन जागृति मासिकाची www.jainjagruti.in ही वेबसाईट अल्पकाळात लोकप्रिय झाली आहे. या वेबसाईटवर जैन जागृति संबंधी सर्व माहिती दिलेली आहे. जैन जागृति अंकातील काही लेख, जाहिरातीचे, वर्गणीचे दर, मासिकाचा इतिहास, तसेच वेबसाईटच्या गॅलरीवर महाराष्ट्र शासनाचे जैन समाजाच्या संदर्भात निघालेले G.R., जैन ध्वज, अष्टमंगल, चौदा स्वप्ने इत्यादी माहिती दिलेली आहे. अल्पकाळात खुप लोकांनी वेबसाईटला भेट दिली आहे.

या वेबसाईट द्वारा अनेक समाजबांधव ऑनलाईन जैन जागृति वर्गणी व जाहिरातचे पेमेंट भरत आहेत.

## जाहिरातदारांचे सहकार्य

जैन जागृति गेली ४९ वर्षे मासिक प्रकाशन द्वारे समाजाची जी सेवा करीत आहे, त्याला आमच्या जाहिरातदारांचे मोलाचे सहकार्य मिळत आहे. जैन जागृतित प्रकाशित होणारे चांगले व वाचनीय साहित्य, नियमितपणा, संप्रदाय सद्भाव, संपूर्ण भारतात प्रचंड वर्गणीदार व जाहिरातीचे माफक दर या जैन जागृतिच्या वैशिष्ट्यामुळेच जैन जागृति मासिकाला शहर, तालुका, अगदी लहान गावातील समाज बांधवांनी जाहिरातीचे सहकार्य दिले आहे. काही व्यापारी, उद्योजक अनेक वर्ष सातत्याने जैन जागृति मासिकात जाहिरात देत आहेत. जाहिरातदारांच्या सहकार्यामुळेच जैन जागृति मासिक दरमहा नियमित प्रकाशित होत आहे.

आजच्या स्पर्धेच्या युगात जाहिरात ही अत्यावश्यक बाब झाली आहे. जैन समाजात 'जैन जागृति' हे सर्वांत प्रभावी माध्यम आहे. म्हणून आपणही आपल्या व्यवसायाची जाहिरात 'जैन जागृति' मध्ये द्यावी ही विनंती.

जैन जागृति मासिक जास्तीत जास्त समाज बांधवां पर्यंत पोहचण्यासाठी जैन जागृतिने ३५ प्रतिनिधींना नेमले आहेत. या सर्वांमुळे जैन जागृति मासिक महाराष्ट्र व भारतात हजारो घरात पोहचला आहे.

## विविध संस्थेत कार्यरत.....

जैन जागृति मासिक प्रकाशना बरोबर संजय व सौ. सुनंदा चोरडिया समाजातील विविध संस्थात, मंडळे यात सहभागी होवून सामाजिक, धार्मिक कार्यात सहभाग घेत असतात. भगवान महावीर जन्मकल्याणक उत्सव समिती पुणे, भारतीय जैन संघटना, अहिंसा रॅली पुणे, साधर्मिक सेवा संघ इ. संस्थेत कार्यरत होते. सध्या ते क्षेत्रपाल प्रतिष्ठान - लोणीकंद, आनंद तीर्थ - चिचोंडी, गौतमालय - वडगाव शेरी, अरिहंत जागृति मंच, ऋतुराज गृहरचना सोसायटी, ऋतुराज मंदीर ट्रस्ट, नवकार जाप ग्रुप इ. संस्थेत तन, मन, धनाने कार्यरत आहेत.

**जैन जागृति संदर्भात...**
**आपले मत, विचार, आठवणी, अभिप्राय पाठवा**

या ४९ वर्षात जैन जागृतिने अनेक विशेषांक सहीत सुमारे ५८० अंक प्रकाशित केले. हजारो घरात जैन जागृति पोहचला आहे. त्याद्वारे हजारो, लाखो लोक जैन जागृति बरोबर जोडले गेले आहे. समाज बांधवानी जैन जागृति व स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया यांच्या संदर्भात आपल्या आठवणी, जैन जागृति विषयी आपले मत, विचार, अभिप्राय जरुर आमच्याकडे पाठवावे. जैन जागृति अंकात त्यांना प्रसिध्दी देण्यात येईल.

**सुवर्ण महोत्सव - Golden Jubilee कार्यक्रम**

गुरु भगवंतांचे आशिर्वाद व समाज बांधवांची मोलाची साथ, हजारो वर्गणीदार व जाहिरातदार, लेखक, प्रेस या सर्वांच्या सहकार्यामुळे आम्ही सुवर्ण महोत्सवी वर्षात प्रवेश करीत आहोत.

डिसेंबर २०१८ मध्ये सुवर्ण महोत्सव वर्षाची सुरुवात म्हणून स्नेह मेळाव्याचे आयोजन केले जाईल. पुढील वर्षी डिसेंबर २०१९ मध्ये ५० वा वर्धापन दिना निमित्त भव्य स्टेज प्रोग्रॅमचे आयोजन करण्यात येईल. त्यावेळी सुवर्ण महोत्सवी अंकाचे प्रकाशन करण्यात येईल.

स्नेहमेळावा व वर्धापन दिन कार्यक्रमास आपला सर्वांचा सहवास लाभावा ही मन:पूर्वक इच्छा. लोभ आहेच, तो वृध्दिंगत व्हावा.

या प्रदीर्घ कालखंडात काळानुसार आम्ही बदललो. वाचकांशी आमचे असलेले नाते अधिकाधिक दृढ झाले. हजारो वाचक आणि समाज बांधवाच्या आपुलकीच्या भावना यामुळेच आमची पुढील वाटचाल अधिक सुखकर होणार आहे.

गत वर्षात जैन जागृति मासिकाद्वारे कळत नकळत कोणाची मने दुखावली असल्यास जैन जागृति - चोरडिया परिवार आपली हार्दिक क्षमायाचना मागत आहे. ●


## ❊ जैन जागृति - दीपावली अंक ❊

**जैन जागृतित जाहिरात देऊन जैन समाजाशी संवाद साधा.**

**ऑक्टोबर - नोव्हेंबर २०१८ (संयुक्त अंक)**

**२६ ऑक्टोबर २०१८ ला प्रकाशित होणाऱ्या दीपावली अंकासाठी १० ऑक्टोबर पर्यंत जाहिरात पाठवा.**

| आर्ट पेपर वर रंगीत (Colour) जाहिरात | |
|---|---|
| ● पूर्ण पान | ● रु. ८५००/-* |
| ● १/२ पान | ● रु. ४६००/-* |
| * डिझाईन व पॉझेटिव्ह खर्च वेगळा (रु. ७००/-) | |
| ● GST 5% Extra | |

| व्हाईट पेपरवर एका रंगात (Black & White) जाहिरात | |
|---|---|
| ● पूर्ण पान | रु. ४०००/- |
| ● १/२ पान | रु. २४००/- |
| ● १/४ पान | रु. १२५०/- |
| ● १/८ पान | रु. ८००/- |

आजच्या स्पर्धेच्या युगात जाहिरात ही अत्यावश्यक बाब झाली आहे. जैन समाजात ''जैन जागृति'' हे सर्वांत प्रभावी माध्यम आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात ''जैन जागृति'' मध्ये द्या.

**महाराष्ट्रातील जास्तीत जास्त शहरे, तालुका, लहान गावातील जैन समाजापर्यंत पोहचण्यासाठी सर्वोत्तम मार्ग - जैन जागृति**

# क्षमा से विकसित होगी ब्रह्माण्डीय चेतना

**लेखिका – आगमवेत्ता साध्वी वैभवश्री जी 'आत्मा', चातुर्मास – महावीर प्रतिष्ठान, पुणे**

फर्क है एक बगीचे और एक जंगल में। जंगल बेतरतीब होता है, जबकि बगीचा व्यवस्थित होता है। जंगल को कोई बनाता नहीं, वह प्रकृति का हिस्सा है, लेकिन बगीचे को माली अपना श्रम देता है, अपना भाव देता है, अपने हाथ देता है, अपना साथ देता है। वह माली और उसके मालिक के ईरादों से बनता है, इसीलिए बगीचा सुन्दर और सुव्यवस्थित होता है। लेकिन जंगल उतना सुव्यवस्थित न भी हो, तब भी जंगल की एक आन्तरिक व्यवस्था है, वह व्यवस्था जो किसी इंसान के द्वारा हस्तक्षेप करके पैदा नहीं की गई है। व्यवस्था उसके अपने भीतर में ही है।

प्रकृति अपने बीजों को कुछ दूरी पर फैंकती है और हवा, पानी या पक्षी उन्हें दूर ले जाते हैं और वृक्ष उग आते है। ये वृक्ष परस्पर एक-दूसरे के साथ जुड़े हुए रहते हैं। हम इन वृक्षों में समूह चेतना देख सकते हैं। ऐसी समूह चेतना उन बगीचों में नहीं विकसित होगी क्योंकि वे बगीचे व्यक्तिगत रूप से विकसित किए गए हैं। वहाँ व्यक्ति चेतना विकसित हो जाएगी किन्तु समूह चेतना विकसित नहीं हो पाएगी।

ऐसे ही हम लोग हैं, हमारी व्यक्ति चेतना तो काफी विकसित हो जाती है लेकिन हमारी समूह चेतना तब तक विकसित नहीं हो पाती, जब तक कि हर जगह हमारा अहंकार हस्तक्षेप करता रहेगा। जो अपनी व्यक्तिगत चेतना को, अपनी Individuality को बहुत ज्यादा Promote नहीं करता, सबके साथ जुड़कर रहता है, egoless बन कर रहता है तो उसके भीतर एक समूह चेतना develop हो पाती है।

समूह चेतना व्यक्ति में तब develop होती है, जब एक व्यक्ति consiously अपने भीतर क्षमा को जीता है, प्रेम को जीता है क्योंकि मनुष्यों को क्षमा व प्रेम की शिक्षा दी जाती है, जंगल के प्राणियों को नहीं। वृक्षों को नहीं, क्योंकि वहाँ क्षमा और प्रेम स्वाभाविक है। लेकिन आदमी अब natural नहीं बचा, artifical हो चुका है। अगर वो क्षमा और प्रेम को अपनाता है तो वो पुन: एक समूह चेतना का हिस्सा बनेगा। मात्र समूहगत ही नहीं पूरी समष्टिगत चेतना यानि पूरा ब्रह्माण्ड, पूरी ब्रह्माण्डीय चेतना cosmic consciousness बन जाएगा लेकिन अगर वह क्षमा और प्रेम को नहीं अपनाता है, जिन्दगी में हमेशा अपनी मान्यताओं, अपनी सोच, अपने संस्कार, अपने आदर्श, अपनी धारणा, अपनी इच्छाएँ, अपने मत-इन सबको स्थापित करने की कोशिश में जुटा रहता है और दूसरों को काटता रहता है तो वो व्यक्ति व्यक्ति तो रहेगा ही,लेकिन वह सिकुड़ता चला जाएगा और अन्यों से कटता चला जाएगा। जितना वो लोगों को काटेगा, वह खुद लोगों से कटता जाएगा, दूर होता जाएगा और तब एक व्यक्ति की चेतना सिकुड़ती चली जाएगी। वह विराट नहीं हो पाएगी और जहाँ व्यक्ति की चेतना संकीर्ण होती जाती है, वहाँ वह अधर्ममय होती है और जहाँ व्यक्ति की चेतना विराट होती है, उदार होती है-वहाँ वह धर्ममय हो जाती है।

धर्ममय होने के लिए क्षमा और प्रेम की आवश्यकता है क्योंकि बिना क्षमा और प्रेम के हमारे भीतर Collective और Universal consciousness विकसित नहीं हो सकती है। जब तक ऐसा नहीं होगा, तब तक हम अपने स्वरूप में नहीं आ पाएँगे। जो स्वरूप में जीता है, वही धार्मिक है। जो स्वरूप में नहीं जीता, वह अधार्मिक है। हम सब एक-एक व्यक्ति के रूप में तो विकसित हो रहे हैं लेकिन क्या हम ब्रह्माण्डीय अस्तित्व के रूप में विकसित हो रहे हैं? अगर नहीं हो रहे हैं तो

हमें संभलने की आवश्यकता है ताकि हम ब्रह्माण्डीय अस्तित्व के रूप में विकसित हो सकें। इसीलिए धर्म साधनाएँ होती है ताकि हर एक व्यक्ति अपने भीतर उन सद्‌गुणों को develop कर सके, जिससे परस्पर दूरियाँ मिटाई जा सके। उसके जीवन में पारस्परिकता प्रकट हो सके, आत्मीयता प्रकट हो सके और एकात्मता प्रकट हो सके।

बिना क्षमा व प्रेम के हम स्वार्थी, अनुदार व संकीर्ण बने रहेंगे। आज के युग में हम परस्पर एक-दूसरे के साथ जुड़ना ही पसंद नहीं करते हैं क्योंकि हमें लगता है कि परस्पर जुडेंगे तो एक-दूसरे को सहना पड़ेगा। एक-दूसरे के लिए व्यक्तिगत हितों को छोड़ना पड़ेगा। हमें अपने अहं को झुकाना मंजूर नहीं, इसी कारण परिवार टूटते जा रहे हैं। रिश्ते केवल ज़रूरत के व मतलब के रह गए हैं। जब तक अहं नहीं टकराता तब तक ठीक वरना 'तू कौन व मैं कौन' वाली स्थिति खड़ी हो जाती है। घटती स्नेहशीलता व बढ़ती असहनशीलता ने हमें अकेलेपन की बीमारी से ग्रस्त बना दिया है। हम घटते, कटते जाएँगे तो आखिर किस हद तक सिकुड़ते जाएँगे। क्यों न हम अपने स्वार्थ व व्यक्तिगत सोच को परे रखकर समूह चेतना के विकास में सहयोगी बने। अपने हृदय के प्रेम को रोकने व बाँटने वाले हर तत्व से खुद को बचाकर चलना सीखें। क्षमा द्वारा निज अन्तर् जगत की शुद्धि करें और प्रेम को विराट बनाकर ब्रह्माण्डीय चेतन अवस्था को विकसित कर लें। वही कैवल्य है।

जय हो! आपका कल्याण हो !!

प्रेषक:- साधिका प्राग्भा विराट
जय गुरुदेव साहित्य
'एलार्का हाऊस'; ११वीं ई रोड़ सरदारपुरा, जोधपुर।
फोन नं:- ९१ ९७९९९८५७०३;
charammangal@gmail.com

# क्षमा शील बनें !

**लेखक : पूज्य आचार्यदेव श्रीमद् विजय रत्नसेनसूरीश्वरजी म.सा.**

## क्रोध से दुर्गति

⁕ ऋण (कर्जा) की कभी उपेक्षा मत करना । लगभग पांच सात वर्ष में तो वह दुगना हो जाता है।

⁕ शरीर में पडे घाव का विश्वास मत करना, उसको बढते देर नहीं लगती है ।

⁕ आग का विश्वास मत करना, ईंधन मिलते ही वह क्षणभर में विकराल रूप ले लेती है ।

परंतु क्रोध का तो बिलकुल विश्वास मत करना । क्रोध से होनेवाले अनर्थ को कोई पार नहीं है । घाव व आग से जो नुकसान होता है, उसकी पूर्ति कदाचित् शक्य है । क्रोध तो आत्मा को दुर्गति में धकेल देता है, जहाँ से पुन: ऊपर उठना मुश्किल हो जाता है ।

## क्रोध के अनर्थ

क्रोध के अनेक अनर्थ है । क्रोध शरीर व मन को तपाता है । क्रोधी का मन शांत नहीं, संतप्त होता है। क्रोध वैरभाव को बढ़ावा देता है । उत्पन्न हुई आग पर तत्काल जल का छंटकाव किया जाय तो वह आग जल्दी शांत हो जाती है, अन्यथा ज्वाला का रूप लेकर महा-अनर्थ पैदा कर देती है क्रोध की आग उत्पन्न होते ही क्षमा के जल से बुझा देनी चाहिये, अन्यथा वह क्रोध की आग वैर के दावानल में बदलते देर नहीं लगती है ।

क्रोध के आवेग में आयुष्य का बंध पडे तो दुर्गति के ही आयुष्य का बंध पडता है । अनंतानुबंधी क्रोध आत्मा को सम्यग्दर्शन से भ्रष्ट कराकर भयंकर नरक में धकेल देता है ।

क्रोध, अशांति पैदा करता है। जहां, क्रोध की ज्वालाएँ भडक रही है वहाँ शांति की कल्पना शक्य नहीं है । क्रोध सर्वप्रथम वातावरण में रही शांति को भंग कर देता है । क्रोध और शांति को मेल नहीं है ।

## वैर की ज्वाला, क्षमा का जल

खून से सने वस्त्र को खून से धोया नहीं जा सकता है । वस्त्र को धोने के लिए तो निर्मल जल चाहिये । उसी प्रकार वैर से वैर कभी शांत नहीं होता है, आग में इंधन डालने से तो आग अधिक प्रज्वलित होती है, उसी प्रकार वैर का बदला लेने से वैर की परंपरा का अंत नहीं आता है, बदले की भावना से तो वैर की ज्वाला और अधिक भडकती है । वैर की आग को शांत करना होगा, क्षमा के जल से । कोई आग बने तो तुम पानी बनों । आखिर जीत पानी की ही होगी, आग की कदापि नहीं ।

## क्रोध की चिनगारी

आग की लपटें देखते ही देखते भयंकर विकराल रूप धारण कर लेती है । आग की चिनगारी तो मामूलीसी होती है, किंतु उसका परिणाम अत्यंत ही खतरनाक होता है । क्रोध की ज्वाला तो उस आग से भी अधिक खतरनाक है । आग का नुकसान इहलौकिक होता हैं, जिसकी पूर्ति अन्य प्रयत्नों से संभव है, किंतु क्रोध की ज्वालाओं से जो भयंकर नुकसान होता है, उसे पार पाना अत्यंत ही कठीन है । क्रोध का विपाक अत्यंत ही कटु है । मोक्ष के निकट दिखने वाली आत्मा को क्रोध अनंत संसारी बना देता है ।

## संघर्ष का मूल

आज मेचिंग का जमाना है । कपडो के रंगो का मेचिंग ।

फर्निचर के रंगों का मेचिंग !! दीवार के रंगो का मेचिंग !!!

सब जगह 'मेचिंग' जरुरी है, परंतु आश्चर्य है कि सर्वत्र रंगो में मेचिंग की बात करने वाला व्यक्ति अपने ही परिवार के साथ... अपने ही मित्रों के साथ.... स्वभाव को मेच करने के लिए तैयार नहीं होता है । इस कारण रंगों का मेचिंग हो जाने के बाद भी स्वभाव मेचिंग नहीं होने से सर्वत्र संघर्ष का वातावरण देखने को मिलता है । संघर्ष मिटाना हैं तो मेच होना सीखें।

## सहिष्णु बनें

जीवन में शांति के लिए अनिवार्य गुण है - सहनशिलता । किसी के कटु शब्दों को, किसी के कटु व्यवहार को, जो सहजता से सहन कर लेता है, वहां संघर्ष स्वत: शांत हो जाता है और जहाँ सहनशक्ति नहीं होती हैं - वहां तुरंत ही आग भडक जाती हैं । असहिष्णु व्यक्ति आग के समान होता हैं, जबकि सहिष्णु व्यक्ति का जीवन जल के समान होता हैं । आग और जल के संघर्ष में जल ही विजयी बनता है। असहिष्णु और सहिष्णु व्यक्ति की लडाई में हमेंशा सहिष्णु ही विजयी बनता है ।

## धैर्य रखें

जल्दबाजी में, नासमझी में, गलतफहमी में और आवेश में व्यक्ति अपने संतुलन को खो देता है । उसका दिमाग Unbalanced असंतुलित हो जाता है। असंतुलित दिमाग से जो निर्णय होगा - वह अपरिपक्व होगा । उसे बाद में बदलना पडेगा, अत: जीवन में खूब धैर्य रखे । सहिष्णु बने और किसी बात का निर्णय जल्दबाजी में न करे । तनावग्रस्त व्यक्ति का संतुलन बराबर नहीं होता है । आवश्यकता हैं तराजु की भांति समतोल बनने की । जीवन में हार-जीत होती रहती है, परंतु उन सबके बीच अपना मन संतुलित रहना चाहिये।

## वैर की गाँठ छोडें

कैंसर की गाँठ अत्यंत खतरनाक होती है । दर्दी का दर्द अत्यंत असह्य हो जाता है । कैंसर की गांठ से भी अधिक भयंकर है वैर की गांठ । कैंसर से बचना शायद संभव न हो तो भी वैर की गांठ को तोडना तो अपने हाथ की बात है । मैत्री की कैंची से वैर की गांठ को दूर किया जा सकता हैं । कैंसर की गांठ पैदा ही न हो, शायद इससे बचना कठिन हो सकता है, परंतु वैर की गांठ पैदा ही न हो, वैसा प्रयास तो हम आसानी से कर सकते है । मैत्री के द्वारा हम वैसा वातावरण खडा कर सकते हैं, जिससे वैर की गांठे उत्पन्न ही न हो ।●

## कव्हर तपशील - सप्टेंबर २०१८

❖ **जैन जागृति – बेस्ट जैन मासिक पुरस्कार**

श्री सुर्यदत्ता एज्युकेशन फाऊंडेशन, बन्सी-रत्न चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे १२ ऑगस्ट २०१८ रोजी सामाजिक कार्यात मोलाचा योगदान देणाऱ्या जैन बांधवाचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी जैन जागृति मासिकाला ''बेस्ट जैन मासिक पुरस्कार'' देऊन सन्मानित करण्यात आले. जैन जागृतिचे संपादक श्री. संजयजी कांतीलालजी चोरडिया यांना अभिनेते रझा मुराद, योगाचार्य संप्रसाद यांच्या हस्ते मोमेन्टो व सन्मानपत्र देण्यात आले. यावेळी श्री सुर्यदत्ता एज्युकेशन फाऊंडेशनचे डॉ. संजय चोरडिया, सौ. सुषमा चोरडिया, डॉ. दिपक शिकारपूर, श्री. कृष्णकुमार गोयल, श्री. अभय छाजेड इ. मान्यवर उपस्थित होते.

❖ **बन्सी-रत्न चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे**

श्री सुर्यदत्ता एज्युकेशन फाऊंडेशन, बन्सी-रत्न चॅरिटेबल ट्रस्ट व वर्धमान प्रतिष्ठान शिवाजीनगर पुणे यांच्या तर्फे आदर्श माता-पिता पुरस्कार, समाजभूषण पुरस्कार व १० वी आणि १२ वी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार १२ ऑगस्ट २०१८ रोजी करण्यात आला.

या प्रसंगी सामाजिक कार्यात मोलाचे योगदान देणाऱ्या जैन बांधवांचा देखील सन्मान करण्यात आला. यावेळी आदर्श माता-पिता पुरस्कार नवलखा उद्योग समुहाचे श्री. बिरदीचंदजी व सौ. शांताबाई नवलखा यांना देण्यात आला.

सौ. कमलदेवी प्रकाशचंदजी कर्नावट यांना समाजर त्न पुरस्कार श्री. रामलालजी शिंगवी यांना समाज भूषण पुरस्कार, प्रसिध्द सामाजिक कार्यकर्ते आणि रांका ज्वेलर्सचे श्री. ओमप्रकाश रांका यांना समाजभूषण पुरस्कार, श्री. विलास राठोड यांना मानव सेवा पुरस्कार आणि जैन जागृति मासिकाला उत्कृष्ट जैन मासिकाचा पुरस्कार संजय चोरडिया यांना प्रदान करण्यात आला. मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

प्रसिध्द ज्येष्ठ अभिनेते रझा मुराद आणि प्रसिध्द योगाचार्य डॉ. संप्रसाद विनोद यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ योगगुरु डॉ. दत्ता कोहिनकर, प्रसिध्द संगणकतज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर, बन्सी-रत्न चॅरिटेबल ट्रस्टचे प्रमुख डॉ. संजय चोरडिया, सुषमा चोरडिया, कोहिनूर उद्योग समुहाचे कृष्णकुमार गोयल, काँग्रेसचे वरिष्ठ नेते अभय छाजेड, भारत देसडला आदी मान्यवर उपस्थित होते.

❖ **आनंद जन्मोत्सव – चेन्नई**

आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांचा ११९ वा जन्मोत्सव व अठाई तपोत्सव परम पूज्य उपाध्याय प्रवर श्री प्रवीणऋषिजी म.सा., पूज्य श्री तीर्थेशऋषिजी म.सा., आचार्य प्रवर श्री पुषपदंतसागरजी म.सा., आचार्य मज्जिनपूर्णानन्दजी म.सा., उप-प्रवर्तक श्री विनयमुनिजी म.सा. ''वागीश'', उप-प्रवर्तक श्री गौतममुनिजी म.सा. गुणाकार, पूज्य श्री संयमरत्नविजयजी म.सा., पूज्य श्री भाग्यचन्द्रविजयजी म.सा., महासती श्री कुमुदलताजी म.सा., महासती श्री अक्षयप्रज्ञाजी म.सा., महासती श्री मधुस्मिताजी म.सा. यांच्या पावन सान्निध्यात सुमारे १०,००० श्रावक-श्राविका यांच्या उपस्थित संपन्न झाला.

यावेळी २१ कुष्ठरोगी, ४ आंधळे यांच्या सहीत सुमारे १००८ अठाई संपन्न झाल्या. मासखमण तपस्वीचा सत्कार करण्यात आला. 'माँ हुलसा'' पुरस्कार देण्यात आले.

❖ **आर. के. लुंकड डायलिसिस सेन्टर, भोसरी**

ऑल इंडिया स्थानकवासी जैन कॉन्फ्रेन्स – गुरु आनंद कुंदन चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या अंतर्गत पूजा हॉस्पिटल भोसरी येथे आर. के. लुंकड डायलिसिस

सेंटर सुरु करण्यात आले. या डायलिसिस सेंटरचे उद्घाटन ज्येष्ठ समाजसेवक पद्मश्री श्री. आण्णासाहेब हजारे, उद्योजक श्री. प्रकाशजी धारीवाल, युवा संगठण श्री. पारसजी मोदी, उद्योजक श्री. रमणलालजी लुंकड, डॉ. जवाहर भळगट यांच्या हस्ते २१ ऑगस्ट रोजी संपन्न झाले. यावेळी सोबत श्री. मोहनलालजी चोपडा, श्री. सुभाषजी ललवाणी, श्री. सागरजी साकला, श्री. रविंद्रजी लुंकड, श्री. संजयजी चोरडिया, रुचिरा सुराणा इ. मान्यवर

❖ **डॉ. सौ. स्वाती पारख, लोणावळा – पुरस्कार**
लोणावळा येथील श्री. विरेंद्र माणिकलालजी पारख यांच्या धर्मपत्नी डॉ. सौ. स्वाती विरेंद्र पारख यांना क्वालंलपूर, मलेशिया येथे वास्तुशास्त्र क्षेत्रातील इंटरनॅशनल लाईफ टाईम अचिव्हमेंट ॲवार्ड हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. मलेशियन ॲक्ट्रेस मायरा तसेच ज्योतिष विश्व विद्यापीठ उज्जैन चे डीन डॉ. भुनेश घाटगे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

❖ **श्री. आदेश खिंवसरा – पुणे मनपा सन्मान**
पुणे येथील युवा कार्यकर्ते व सामाजिक, धार्मिक क्षेत्रात अग्रेसर श्री. आदेश खिंवसरा यांचा पुणे मनपा तर्फे सामाजिक क्षेत्रात विशेष कार्याबद्दल १५ ऑगस्ट रोजी विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी महापौर सौ. मुक्ता टिळक, सभागृह नेता व नगरसेवक श्री. श्रीनाथ भिमाले, नगरसेवक श्री. प्रवीणजी चोरबेले यांच्या हस्ते मोमेन्टो देण्यात आला.

❖ **श्री. प्रफुलजी कोठारी – पुणे मनपा सन्मान**
वडगाव शेरी, पुणे येथील युवा कार्यकर्ते, सामाजिक व धार्मिक क्षेत्रात अग्रेसर, कोठारी चॅरिटेबल ट्रस्ट डायलेसिस सेंटरचे प्रमुख श्री. प्रफुल्लजी कोठारी यांचा पुणे मनपा तर्फे सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल १५ ऑगस्ट रोजी महापौर सौ. मुक्ता टिळक यांच्यातर्फे सन्मान करण्यात आला.

❖ **श्री. विजयराजजी राका, पुणे**
फॅन्टासी ग्रुपतर्फे ३१ जुलै रोजी रफी मेलडी सादर करण्यात आला. यावेळी पुणे येथील गुलाबचंद चतरिंगजी ज्वेलर्स या पेढीचे संचालक, शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक कार्यात अग्रेसर श्री. विजयराजजी राका यांनी महंमद रफीची अतिशय सुंदर गाणी स्टेजवर सादर केली. ●

## आभार गीतिका

आगमवेता साध्वी वैभवश्रीजी 'आत्मा' आदि ठाणा इनका चातुर्मास महावीर प्रतिष्ठान पुणे यहाँपर संपन्न हो रहा है । प्रवचन के बाद क्षमापना एव आभार गीतिका कही जाती है । यह आभार गीतिका रोज अपने घर पर व्यक्तीगत एवं सामुहिक कहनी चाहिए – संपादक

**पृथ्वी को धन्यवाद, पानी को धन्यवाद**
**अग्नि को धन्यवाद, वायु को धन्यवाद**
**हरितक को धन्यवाद, त्रस प्राणी धन्यवाद ।।**
**धन्यवाद – धन्यवाद – धन्यवाद – धन्यवाद ।।**

**सबका सहयोग मिला, आनन्द का भोग मिला**
**दिल में उजास खिला, सुन्दर–सा आज मिला**
**दानी उत्साह के, गुरूवर को धन्यवाद**
**धन्यवाद – धन्यवाद – धन्यवाद – धन्यवाद ।।**

**प्यारे माता–पिता, प्यारी संतान हो**
**बढिया हमदम रहे, सभ्यों में शान हो**
**प्यारा पडौस हो, परिजन को धन्यवाद**
**धन्यवाद – धन्यवाद – धन्यवाद – धन्यवाद ।।**

**सबमें सद्भाव हो, प्रेमी स्वभाव हो**
**दिल में भाई सखा के, बढ–बढ के प्यार हो**
**सबके कल्याण के, भावों को धन्यवाद**
**धन्यवाद – धन्यवाद – धन्यवाद – धन्यवाद ।।** ●

# दीपावली पूजन विधी

भारतात व परदेशात बहुसंख्य जैन परिवारात दीपावली पूजनाची विधी जैन जागृति मासिकावरुन केली जाते. जैन जागृतिचा ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१८ चा अंक 'दीपावली अंक' म्हणून २४ ऑक्टोबर २०१८ ला प्रसिद्ध होत आहे. या भव्य अंकात विविध लेखा बरोबर दीपावली पूजनाची विधी व मुहुर्त प्रसिद्ध केले जाणार आहे. हा अंक पोस्टाद्वारे दीपावली पूर्वी लोकांना जर मिळाला नाही तर समाज बांधवांची दीपावली विधीसाठी गैरसोय होऊ नये म्हणून या अंकातही दीपावली पूजनाची विधी व मुहुर्त प्रसिद्ध केले आहेत.

जैन जागृतिची वेबसाईट www.jainjagruti.in वर ही दीपावली पूजन विधी व मुहुर्त दिलेली आहे.

– संपादक

---

दीपावली हा दिव्याचा, तेजाचा, प्रकाशाचा, चैतन्याचा, आनंदाचा, उत्साहाचा, संकल्पाचा एक मंगलोत्सव. दीपावलीची अमावस्येचा दिवस म्हणजेच श्रमण भगवान महावीर स्वामींची निर्वाण रात्र. महावीर प्रभू याच रात्री पावापुरी मध्ये सर्व कर्मबंधन तोडून आणि देह सोडून मुक्त झाले. चतुर्दशी, अमावस्या आणि नवे वर्ष (कार्तिक शुद्ध प्रतिपदा) या तीन दिवसाचा हा उत्सव आहे. पौषध, उपवास आणि विशिष्ट जप-ध्याना करिता हा उत्सव अत्यंत महत्त्वाचा आहे. चतुर्दशी आणि अमावस्या या दोन दिवसा मध्ये उपवास केला जातो आणि भगवान महावीरांचा अंतिम उपदेश ज्या आगम ग्रंथात संग्रहीत केला आहे, त्या 'उत्तराध्ययन सूत्र'चे पठण, पाठण व श्रवण केले जाते. दीपावलीची सर्व रात्र महावीर प्रभूचे जाप ध्यान केले जाते. नव्या वर्षीच्या प्रात:काळी भगवान महावीरांचे प्रथम शिष्य ज्येष्ठ गणधर श्री गौतमस्वामी यांना केवलज्ञानाची सर्वज्ञाची प्राप्ती झाल्याने त्यांचे गुणगान केले जाते. अधिकांश जैन समाज आपल्या गुरुजनांच्या श्री मुखातून महाप्रभावशाली मंत्र गर्भित स्तोत्रांचे पठण तसेच गौतम स्वामींच्या मंगल रासाचे श्रवण करुन नव्या वर्षास प्रारंभ करतात.

---

## दीपावली पूजन विधी

सर्व प्रथम पुजेला बसणाऱ्या सर्वांनी मंगल भावासहित तीन नवकार महामंत्राचा उच्चार करावा.

**नमस्कार महामंत्र**

णमो अरिहंताणं, णमो सिध्दाणं, णमो आयरियाणं,
णमो उवज्झायाणं, णमो लोए सव्वसाहूणं,
एसो पंच णमोक्कारो, सव्वपावप्पणासणो,
मंगलाणं च सव्वेसिं, पढमं हवइ मंगलं ।।

**तीर्थंकरांना वंदना**

समवसरणचे ध्यान करुन पूर्व व उत्तर दिशा मधील ईशान्य दिशेस तीर्थंकरांना वंदना करा.

**गुरुदेवांना वंदना**

आपण आपल्या गुरुदेवांना वंदना करा.

---

- शुभ मुहूर्तावर गादी अंथरुण त्यावर भगवान महावीर स्वामीजी, श्री गौतम स्वामीजी, श्री लक्ष्मी देवी, श्री सरस्वती देवी इ. चे फोटो पूर्व किंवा उत्तर दिशेला ठेवावेत.
- गादीवर नव्या वह्या, बिल बुके, चेक पुस्तक, सोने, चांदी किंवा धातुचे देवी-देवांचे शिक्के, दौत, पेन, पूजेसाठी लक्ष्मी व पूजेचे साहित्य ठेवावे.

**॥ ॐ अर्हम् नम: ॥**

**श्री**

**श्री श्री**

**श्री श्री श्री**

**श्री श्री श्री श्री**

**श्री श्री श्री श्री श्री**

**श्री श्री श्री श्री श्री श्री**

**श्री श्री श्री श्री श्री श्री श्री**

**श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री**

**श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री**

**श्री शुभ 卐 श्री लाभ**

**श्री आदिनाथाय नम:** **श्री शांतीनाथाय नम:**

**श्री पार्श्वनाथाय नम:** **श्री महावीराय नम:**

**श्री सद्‌गुरूभ्यो नम:**

श्री गौतमस्वामी की लब्धि, श्री भरतजी की ऋध्दि, श्री अभयकुमारकी बुध्दि, श्री कयवन्नाजीका सौभाग्य, श्री धन्ना शालिभद्रजीकी संपत्ति, श्री बाहुबलीजीका बल, तथा श्री श्रेयांसकुमार की दानवृत्ती प्राप्त होवे !

श्री जिनशासन की प्रभावना होवे !

॥ श्री सरस्वती देवी नम: ॥ श्री महालक्ष्मी देवी नम: ॥

वीर संवत २५४५, विक्रम संवत २०७५

कार्तिक सुद १ गुरुवार दि. ८/११/२०१८

पूजन दिन बुधवार दि. ७/११/२०१८

卐

- पूजेचे साहित्य – विड्याची देठासहित पाने, सुपारी, लवंग, विलायची, कुंकुम, वासक्षेप, अक्षदा (तांदूळ), श्रीफळ, फुले, तुपाचा दिवा, धूप, अगरबत्ती, जल, फळे, ऊस, नैवेद्य, लाह्या, बत्तासे, मोळी, आरती साठी कापूर इ.
- पुजा करणाऱ्यांनी तीन नवकार मंत्राचा जाप करून हातात मोळी बांधावी. सर्वांना कुंकूतिलक, अक्षदा लावावे.
- गादीच्या उजव्या बाजूस तुपाचा दिवा व डाव्या बाजूस धूप किंवा उदबत्ती लावावी.
- नवकार म्हणत-म्हणत दौत, लेखणी, दिवा, कळस, लक्ष्मी, ऊस इ. ना मोळी बांधावी.
- नव्या वहीच्या पहिल्या पानावर शेजारील चौकोनातील मजकूर लिहावा.

चौकोनातील मजकुर वहीत लिहून झाल्यावर त्या खाली ओल्या कुंकवाने स्वस्तिक काढावे. नवीन वह्या, मागील वर्षाची अकाऊंटची एक वही, बिल बुके, चेक पुस्तक, लक्ष्मी इ. सर्वांवर विड्याची देठासहित एकावर एक दोन पाने ठेवावी व त्याच्या वर एक रुपया, सुपारी, लवंग, विलायची ठेवावी. वह्यांच्या चारी बाजूस हातात थोडे पाणी घेऊन फिरवावे. मग वासक्षेप कुंकुपुष्पमिश्रित तांदुळाचे दाणे हातात घेऊन पुढे दिलेला श्लोक व मंत्र म्हणावा –

**मंगलं भगवान वीरो, मंगलं गौतम प्रभु: ।**
**मंगलं स्थूलीभद्राद्या, जैन धर्मोस्तु मंगलम् ।**
**मंत्र – ॐ आर्यावर्ते, आस्मिन् जंबूद्वीपे दक्षिणार्धभरते भरतक्षेत्रे-भारतदेशे (पूना) नगरे ममगृहे श्री शारदा देवी श्री लक्ष्मीदेवी आगच्छ आगच्छ, तिष्ठ तिष्ठ स्वाहा ।**

त्या अक्षदा वहीवर टाकाव्या. त्यानंतर खालील स्तुती म्हणावी.

## ।। स्तुती ।।

**स्वश्रीयं श्रीमद् अरिहंता, सिद्धः पुरीपदम्,**
**आचार्य: पंचधाचारं, वाचकां वाचनांवराम्।**
**साधव: सिद्धी साहाय्यं वितन्वन्तु विवेकिनाम्,**
**मंगलानां च सर्वेषां, आद्यं भवति मंगलम् ।**
**अर्हमित्यक्षरं माया, बीजं च प्रणवाक्षरम्,**
**एवं नाना स्वरूपं च, ध्येयं ध्यायन्ति योगिन:।**
**हृत्पदं षोडशदलं, स्थापितं षोडशाक्षरम्**
**परमेष्ठिस्तुते बीजं, ध्यायेक्षरदूरदं मुदा ।**
**मंत्रणामादिमं मंत्रं, तंत्र विघ्नौघ निग्रहे,**
**ये स्मरन्ति सदैवेनं, ते भवन्ति जिन प्रभा ।।**

त्यानंतर खालील मंत्र म्हणत **जल, चंदन, पुष्प, धूप, दीप, अक्षदा (तांदुळ), फळे, नैवेद्य** या आठ वस्तूंनी वहीपूजन करावे.

**ॐ ऱ्हीं श्री भगवत्यै, केवलज्ञान स्वरूपायै, लोकालोक प्रकाशिकायै, सरस्वत्यै, लक्ष्मयै (जलं) समर्पयामि स्वाहा ।**

(दुसऱ्यांदा परत हाच श्लोक म्हणत जलं च्या ऐवजी चंदनं म्हणावे. अशाप्रकारे आठही वस्तुंची नावे घेत आठ वेळा हा श्लोक म्हणावा.)

पूजा करणाऱ्या सर्वांनी उभे राहून खालील स्तोत्र व प्रार्थना म्हणावी–

## ।। श्री सरस्वती स्तोत्र ।।

**सकल लोक सुसेवित पंकजा**
**वर यशोर्जित शारद कौमुदी,**
**निखिल कल्मष नाशन तत्परा**
**जयतु सा जगतां जननी सदा ।।**
**कमल गर्भ विराजित भूधना,**
**मणि किरीट सुशोभित मस्तका,**
**कनक कुंडल भूषित कर्णिका,**
**जयतु सा जगतां जननी सदा ।।**
**वसुहरिद् गज संस्नपितेश्वरी**
**विधृत सोमकला जगदीश्वरी,**
**जलज पत्र समान विलोचना**
**जयतु सा जगतां जननी सदा ।।**
**निज सुधैर्य जितामर भूधरा,**
**निहित पुष्कर वृंदल सत्कारा**
**समुदितार्क सदृतनु बल्लिका,**
**जयतु सा जगतां जननी सदा ।।**
**विविध वांछित कामदुधाद्भूता,**
**विशद पद्म हृदान्तर वासिनी**
**सुमति सागर वर्धन चंद्रिका,**
**जयतु सा जगतां जननी सदा ।।**

## ।। श्री लक्ष्मी स्तोत्र ।।

**नमोस्तुते महालक्ष्मी महासौख्य प्रदायिनी**
**सर्वदा देही मे द्रव्यं, दानाय मुक्ती हेतवे ।। १ ।।**
**धनं धान्य धरां हर्ष, कीर्तिम्, आयु: यश: श्रियम्**
**वाहनाम् दन्तिन् पुत्रान, महालक्ष्मी प्रयच्छ मे ।।२।।**
**यन्मया वांछितं देवी, तत्सर्वं सफलं कुरू**
**न बान्ध्यन्ता कुकर्माणि, संकटान्मे निवारय ।।३।।**

## ।। प्रार्थना ।।

**सुंदर आरोग्य निवास करे दृढ तन में ।**
**आशा, उत्साह, उमंग भरे शुचि मन में ।**
**न हो अनुचित योग प्रयोग धन साधन में ।**
**उत्कृष्ट उच्च आदर्श जगे जीवन में ।**
**तम मिटे, ज्ञानकी ज्योति जगत में छाये ।**
**प्रभु ! दिव्य दिवाली भव्य भाव भर लाये ।**

ही प्रार्थना झाल्यावर एका थाळीत दिवा घेऊन खालील आरती म्हणावी.

## ।। आरती ।।

**सकल जिनंद नमी करी, जिनवाणी मन लाय ।**
**सरस्वति लक्ष्मी करू आरती, आतम सुगुरू पसाय ।।**
**ज्ञान जगत में सार हैं । ज्ञान परम हितकार ।**
**ज्ञान सूर्य से होता है, दुरित तिमिर अपहार ।।**
**श्री सरस्वती प्रभाव से, लहे जगत सम्मान ।**
**ज्ञान बिना पशु सारिखा, पावे अति अपमान ।।**

श्रद्धा मूल क्रिया कही, ज्ञान मूल है तास ।
पावे शिव सुख आतमा, इससे अविचल वास ।।
अष्टमपद विशति पदे, सप्तम नवपद ज्ञान ।
तीर्थंकर पदवी लहे, आराधक भगवान ।।

आरती झाल्यावर खालील अष्टदोहे म्हणावेत.

### ।। अष्टदोहे ।।

अंगुष्ठे अमृत वसे लब्धितणा भंडार ।
जय गुरू गौतम समरिये, वांछित फल दातार ।।१।।
प्रभू वचने त्रिपदी लही, सूत्र रचे तेणीवार ।
चऊदह पूरब माँ रचे, लोकालोक विचार ।।२।।
भगवति सूत्र कर नमी, बंभी लिपी जयकार ।
लोकलोकोत्तर सुख भणी, वाणी लिपी अढार ।।३।।
वीर प्रभू सुखिया थया, दिवाली दिन सार ।
अंतर महूरत तत्क्षणे, सुखिया सहू संसार ।।४।।
केवलज्ञान लहे सदा, श्री गौतम गणधार ।
सुरनर पर्षदा आगले घट अभिषेक उदार ।।५।।
सुरवर पर्षदा आगले, भाखे श्री श्रुतनाण ।
नाण थकी जग जाणिये, द्रव्यादिक चौठाण ।।६।।
ते श्रुतज्ञान ने पुजिये, दीप धूप मनोहार ।
वीर आगम अविचल रहो, वर्ष एकवीस हजार ।।७।।
गुरू गौतम अष्टक कही, आणि हर्ष उल्लास ।
भाव भरी जे समरशे, पुरे सरस्वती आस ।।८।।

### ।। लोगस्स (चउव्वीसत्थव) का पाठ ।।

लोगस्स उज्जोयगरे, धम्मतित्थयरे जिणे ।
अरिहंते कित्तइस्सं, चउवीसं पि केवली ।।१।।
उसभमजियं च वंदे, संभवमभिणंदणं च सुमइं च।
पउमप्पहं सुपासं, जिणं च चंदप्पहं वंदे ।।२।।
सुविहिं च पुप्फदंतं, सीयल सिज्जंच वासुपुज्जं च।
विमलमणंतं च जिणं, धम्मं संतिं च वंदामि ।।३।।
कुंथुं अरं च मल्लिं, वंदे मुणिसुव्वयं नमिजिणं चं।
वंदामि रिट्ठनेमि, पासं तह वध्दमाणं च ।।४।।
एवं मए अभित्थुआ, विहुयरयमला पहीणजरमरणा।
चउवीसंपि जिणवरा. तित्थयरा में पसीयंतु ।।५।।
कित्तियवंदिय महिया, जे ए लोगस्स उत्तमा सिद्धा।
आरुग्गबोहिलाभं, समाहिवरमुत्तमं दिंतु ।।६।।
चंदेसु निम्मलयरा, आइच्चेसु अहियं पयासयरा।
सागरवरगंभीरा, सिद्धा सिद्धिं मम दिसंतु ।।७।।

### ।। नमोत्थुणं का पाठ ।। (२ बार)

नमोत्थुणं अरिहंताणं, भगवंताणं, आइगराणं, तित्थयराणं, संय-संबुध्दाणं, परिसुत्तमाणं पुरिस-सीहाणं, पुरिस-वर-पुण्डरीयाणं, पुरिसवरगंध-हत्थीण, लोगुत्तमाणं, लोगनाहाणं, लोगहियाणं, लोगपईवाणं, लोगपज्जोयगराणं, अभयदयाणं, चक्खुदयाणं, मग्गदयाणं, सरणदयाणं, जीवदयाणं, बोहिदयाणं, धम्मदयाणं, धम्मदेसियाणं, धम्मणायगाणं धम्मसारहीणं धम्मवरचाउरंत-चक्कवट्टीणं दीवोत्ताणं, सरणगइपइट्ठाणं, अप्पडिहयवरनाणदंसणधराणं, विअट्टछउमाणं, जिणाणं जावयाणं, तिन्नाणं तारयाणं, बुद्धाणं बोहयाणं, मुत्ताणं मोयगाणं, सव्वन्नूणं, सव्वदरिसीणं, सिव-मयल-मरुअ-मणंत-मक्खय-मव्वाबाह-मपुणराविति-सिद्धिगइ-नामधेयं ठाणं संपत्ताणं नमो जिणाणं जियभयाणं।

(दूसरे में - ठाणं संपाविउकामाणं णमो जिणाणं जियभयाणं)

### ।। मंगलपाठ ।।

चत्तारि मंगलं, अरिहंता मंगलं, सिद्धा मंगलं, साहू मंगलं, केवलिपण्णत्तो धम्मो मंगलं । चत्तारि लोगुत्तमा, अरिहंता लोगुत्तमा, सिद्धा लोगुत्तमा, साहु लोगुत्तमा, केवलिपण्णत्तो धम्मो लोगुत्तमो । चत्तारि सरणं पव्वज्जामि, अरिहंते-सरणं पव्वज्जामि, सिद्धे-सरणं पव्वज्जामि, साहू-सरणं पव्वज्जामि, केवलिपण्णत्तधम्मं सरणं पव्वज्जामि। अरिहंतो का शरणा, सिद्धों का शरणा, साधुओं का शरणा, केवलिप्ररुपित दयाधर्म का शरणा।

**चार शरणा, दुर्गति हरणा और शरणा नहीं कोय, जो भवी प्राणी आदरे तो अक्षय अमरपद होय ।**

**अंगुष्ठे अमृत वसे, लब्धि तणा भंडार ।**
**श्रीगुरु गौतम सुमरिये, मनवांछित फलदातार।**
**भावे भावना भाविये, भावे दीजे दान ।**
**भावे धर्म आराधिये, भावे केवलज्ञान ।**
**पावे पद निर्वाण ।।**

येथे दीपावलीची विधी पूर्ण होते. ●

---

परंतु दीपावलीचा दिवस हा भगवान महावीरांच्या निर्वाणाचा दिवस आहे. त्या दृष्टिने प्रभूच्या फोटोसमोर दीप व धूप लावून रात्री खालील जपाच्या वीस माळा जपाव्यात.

**ॐ ऱ्हीं श्री महावीर स्वामी सर्वज्ञाय नम:**

त्यानंतर खालील जपाच्या वीस माळा जपाव्यात

**ॐ ऱ्हीं श्री महावीर स्वामी पारंगताय नम:**

ज्यांना या ४० माळा जपणे शक्य नसेल, त्यांनी यथाशक्ती जाप करावा.

कार्तिक शुद्ध प्रतिपदेस पहाटे स्नान करून ३ नमस्कार महामंत्राचा जाप करून नंतर,

**ॐ ऱ्हीं श्री गौतमस्वामी केवलज्ञानाय नम:**

या वीस माळा जपाव्यात.

त्यानंतर पुढील प्रार्थना म्हणावी.

**कुंदिंदुगोखीर तुसार वन्ना**
**सरोज हत्था कमले निसन्ना**
**वाएसिरी पुत्थय वग्ग हत्था**
**सुहायसा अम्ह सया पसथ्था**

या प्रार्थनेनंतर शक्ति तेज विद्या संपदाचा महान ओजस्वी मंत्र

**ॐ ऱ्हीं ॐ**

च्या वीस माळा जपाव्यात.

जैन मंदिरात जाऊन प्रभूचे दर्शन घ्यावे किंवा स्थानकात, उपाश्रयात जाऊन मुनिराजाचे दर्शन करून मंगलीक श्रवण करून यावे. कार्तिक शुद्ध प्रतिपदेस श्री गौतम स्वामींना केवलज्ञान झालेले आहे. त्यासाठी पहाटे गौतम रासाचे अवश्य श्रवण करावे. ●

---


## ❈ जैन जागृति - दीपावली अंक ❈

**जैन जागृतित जाहिरात देऊन जैन समाजाशी संवाद साधा.**

## ऑक्टोबर - नोव्हेंबर २०१८ (संयुक्त अंक)

**२६ ऑक्टोबर २०१८ ला प्रकाशित होणाऱ्या दीपावली अंकासाठी १० ऑक्टोबर पर्यंत जाहिरात पाठवा.**

| आर्ट पेपर वर रंगीत (Colour) जाहिरात | |
|---|---|
| ● पूर्ण पान | ● रु. ८५००/-* |
| ● १/२ पान | ● रु. ४६००/-* |
| * डिझाईन व पॉझेटिव्ह खर्च वेगळा (रु. ७००/-) | |
| ● GST 5% Extra | |

| व्हाईट पेपरवर एका रंगात (Black & White) जाहिरात | |
|---|---|
| ● पूर्ण पान | रु. ४०००/- |
| ● १/२ पान | रु. २४००/- |
| ● १/४ पान | रु. १२५०/- |
| ● १/८ पान | रु. ८००/- |

आजच्या स्पर्धेच्या युगात जाहिरात ही अत्यावश्यक बाब झाली आहे. जैन समाजात ''जैन जागृति'' हे सर्वांत प्रभावी माध्यम आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात ''जैन जागृति'' मध्ये द्या.

**महाराष्ट्रातील जास्तीत जास्त शहरे, तालुका, लहान गावातील जैन समाजापर्यंत पोहचण्यासाठी सर्वात्तम मार्ग - जैन जागृति**

## सन २०१८ चे दीपावली पूजनाचे मुहूर्त

❖ **पुष्प नक्षत्र : आश्विन (मारवाडी मिति कार्तिक) वद्द ७**

**बुधवार दि. ३१-१०-२०१८ :** सकाळी ६.३० ते ८ लाभ, ८ ते ९.३० अमृत
दुपारी ११ ते १२.३० शुभ, ३.३० ते ५ चल, ५ ते ६.३० लाभ
रात्री ८ ते ९.३० शुभ, ९.३० ते ११ अमृत

❖ **धनत्रयोदशी : (धनतेरस) आश्विन (मारवाडी मिति कार्तिक) वद्द १३**

**सोमवार दि. ५-११-२०१८ :** सकाळी ६.३० ते ८ अमृत, ९.३० ते ११ शुभ
दुपारी २ ते ३.३० चल, ३.३० ते ५ लाभ, सायंकाळी ५.०० ते ६.३०
अमृत, ६.३० ते ८ चल, रात्री ११ ते ११.४५ लाभ

❖ **महालक्ष्मी पूजन (दीपावली वही पूजन) : आश्विन (मारवाडी मिति कार्तिक) वद्द ३०**

**बुधवार दि. ७-११-२०१८ :** सकाळी ६.३० ते ८.०० लाभ, ८ ते ९.३० अमृत,
दुपारी ११ ते १२.३० शुभ, ३.३० ते ५ चल, ५ ते ६.३० लाभ,
रात्री ८ ते ९.३० शुभ, ९.३० ते ११ अमृत

वृषभ लग्न कुंभ नवमांश सायंकाळी ६.४१ ते ६.५३, वृषभ लग्न वृषभ नवमांश सायं. ७.१९ ते ७.३०
वृषभ लग्न सिंह नवमांश रात्री ८.०० ते ८.१४

❖ **नूतन वर्ष : वीर संवत २५४५, विक्रम संवत २०७५, कार्तिक शु।। १**

**गुरुवार दि. ८-११-२०१८ :** सकाळी ६.३० ते ८.०० शुभ, दुपारी ११ ते १२.३० चल
१२.३० ते २ लाभ, २ ते ३.३० अमृत
सायंकाळी ५.०० ते ६.३० शुभ, ६.३० ते ८.०० अमृत

**श्री शुभम् भवतु !**

**प्रेषक : नवीनकुमार बी. शहा –** २३० पाटील प्लाझा, मित्र मंडळ चौक, पुणे ९. मो. ९८२२०९०३३९
**पं. भवरलाल, पुरूषोत्तम दायमा** १३०६ रविवार पेठ, पुणे-२. फोन २४४७४८३५, मो. ९२७३७५१३४६

*दीपावली व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !*
**जैन जागृति - चोरडिया परिवार**



**वधू-वर जाहिरात**
**'जैन जागृति'**
**मासिकात व वेबसाईटवर द्या.**
**हजारो जैन परिवार व त्यांचे नातेवाईक, मित्रपरिवार पर्यंत पोहचा.**
आपणांस वधू-वर निवडताना योग्य चॉईस मिळण्यास मदत होईल.